
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 12 | AUGUST - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अरविंद घोष यांचा राष्ट्रवादीचा विचार




**प्रा. डॉ. लक्ष्मण बाबाराव यादव**
राज्यशास्त्र विभाग,
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा.

## जीवन परिचय :-

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासातील अरविंद घोष यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदर्शी मानले जातात. त्यांच्या राष्ट्रवादाला केवळ राजकीय स्वातंत्र्याचे उद्दिष्ट नव्हते. तर ते आध्यात्मिक,सांस्कृतिक आणि नैतिक जागृतीवर आधारित एक सर्वांगीण भारतीय राष्ट्रवाद अस्तित्वात होता. अशा या महान तत्ववेत्यांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता (प. बंगाल) इथे झाला. वडील डॉ. कृष्णधन घोष एक प्रगतिशील वैद्यआई स्वर्णलता देवी घरात पाश्चिमात्य संस्कार आणि आधुनिक शिक्षणाला प्राधान्य होते. अरविंद घोष यांचे आरंभीचे शिक्षण मँचेस्टरमध्ये प्राथमिक शिक्षण,सेंट पॉल्स स्कूल, लंडन येथे पुढील शिक्षण,नंतर केंब्रिज विद्यापीठात (King's College) प्रवेश ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, जर्मन अशा अनेक भाषांवर प्रभुत्व ICS (Indian Civil Services) परीक्षाही उत्तीर्ण, पण ब्रिटिश राजवटीत नोकरी करण्याची इच्छा नसल्याने प्रशिक्षण पूर्ण न करता भारतात परतले. १८९३ मध्ये भारतात परतल्यानंतर बडोदा राज्याच्या सेवेत रुजू झाले.बडोदा महाविद्यालयात प्राध्यापक, नंतर उपप्राचार्य, संस्कृत, बंगाली आणि भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास देशातील युवकांमध्ये राष्ट्रभाव जागविण्यासाठी घोष यांनी अविरत प्रयत्न केले. तिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लाजपत राय आदी उग्र राष्ट्रवाद्यांशी त्यांच्या संपर्कात आले. स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग त्याबरोबरच अरविंद घोष हे भारतातील उग्र राष्ट्रवादाचे प्रमुख नेते होते. स्वदेशी चळवळ (1905–1908), बंगालच्या फाळणीविरोधात सक्रिय सहभाग, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांचे जोरदार समर्थन 'वंदे मातरम्', 'कर्मयोगिन', 'धर्म' इ. वृत्तपत्रांद्वारे तीव्र लेखन, युवक संघटनांना मार्गदर्शन व प्रेरणा,अलिपूर बॉम्ब कट (1908), क्रांतिकारकांशी संबंध आल्याने अटक व एक वर्ष तुरुंगवास.या तुरुंगवासात त्यांना आध्यात्मिक अनुभूती व ध्यानयोग पारंगत प्राप्ती झाली.सुटकेनंतर त्यांचा जीवनमार्ग आध्यात्मिकतेकडे झुकला.

१९१० मध्ये ते पाँडिचेरी (त्यावेळी फ्रेंच वसाहत) येथे स्थायिक झाले.राजकारणातून निवृत्त होऊन ध्यान, योग, लेखन आणि मानवजातीच्या आध्यात्मिक उत्क्रांतीसाठी कार्य केले. इंटीग्रल योग (संपूर्ण योग) ही अद्वितीय अध्यात्मदर्शनाची

संकल्पना विकसित केली. त्यांच्या सोबत मदर (मीर्रा अल्फासा) यांनी आश्रमाच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली. साहित्य, योग आणि तत्त्वज्ञान यांचे ज्ञान प्राप्त केले.

अरविंद घोष हे केवळ राष्ट्रवादीच नव्हे तर महान कवी, तत्त्वज्ञ, योगी आणि द्दष्टा होते.त्यांची प्रमुख ग्रंथसंपदा ही The Life Divine – अध्यात्मिक तत्त्वज्ञान, Savitri – अत्यंत मोठी आध्यात्मिक महाकाव्य, Essays on the Gita, The Synthesis of Yoga, Foundations of Indian Culture, The Human Cycle, या साहित्याद्वारे त्यांनी मानवाच्या चेतना-विकासाचा मार्ग स्पष्ट केला. अनेक दशकांची साधना, लेखन आणि मानवतेच्या भविष्यासंबंधी दूरद्दष्टीपूर्ण कार्य अविरत पणे त्यांनी केले व शेवटी ५ डिसेंबर १९५० पाँडिचेरी येथील आश्रमात समाधी घेतली, अशा या महान राष्ट्रवादी विचारवंतांचे राष्ट्रवादासंबंधी विचार पुढील प्रमाणे,

## अरविंद घोष यांचा राष्ट्रवाद :-

अरविंद घोष हे भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहेत. क्रांतिकारी, राष्ट्रवादी, कवी, योगी, तत्त्वज्ञ आणि मानवचेतनेचे मार्गदर्शक म्हणून त्यांना ओळखले जाते .त्यांचे कार्य भारतीय राष्ट्रवादापासून ते जागतिक अध्यात्मपर्यंत विस्तीर्ण स्वरूपाचे होते. त्यांचा राष्ट्रवादी स्पष्ट करत असताना खालील घटकांचा आधार घेता येईल.

### 1) राष्ट्रवादाचे आध्यात्मिक स्वरूप:- (Spiritual Nationalism)

अरविंद घोष यांनी राष्ट्रवादाला दैवी शक्तीची अभिव्यक्ती मानले. त्यांच्यानुसार राष्ट्रवाद हा केवळ भूभागावरील प्रेम नसून भारतमातेच्या रूपातील जीवंत शक्तीची भक्ती आहे.भारत हे केवळ भौगोलिक क्षेत्र नाही, तर 'जीवंत देवता – एक शक्ती, एक संस्कृती, एक आत्मा आहे.भारताचा स्वातंत्र्यसंग्राम हा धर्मयुद्ध (Sacred Mission) आहे, कारण तो सत्य, धर्म आणि न्यायासाठी लढा आहे. राष्ट्रवाद हा मानवी चेतनेचा विकास आहे आणि तो अध्यात्माद्वारेच पूर्णत्वाला पोहोचतो.

### 2) पूर्ण स्वराज्याची (Complete Independence) घोषणा:-

अरविंद घोष हे भारतातील पहिले विचारवंत होते.ज्यांनी पूर्ण स्वातंत्र्य ही संकल्पना मांडली.त्यांनी स्पष्टपणे सांगितले की भारताचे उद्दिष्ट "सुधारित वसाहतशाही" नसून पूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळवणे आहे. Freedom is the life-breath of a nation. 'मध्यममार्गी सुधारणा' भारताला गुलामगिरीतून मुक्त करू शकत नाही, असे ते ठामपणे म्हणत.

### 3) क्रांतिकारक राष्ट्रवाद (Revolutionary Nationalism) :-

घोषांनी युवकांना निर्भयपणे संघर्ष करण्याचे आवाहन केले त्यांच्यासाठी क्रांती म्हणजे हिंसाचार नव्हे तर नैतिक धैर्य आणि त्याग. इंग्रजांच्या विरोधात अहिंसक प्रतिकार, बहिष्कार, स्वदेशी, टिळ कांसोबत जहाल राष्ट्रवाद या धोरणांचा त्यांनी आग्रह धरला. त्यांनी बंगालमध्ये क्रांतिकारी चळवळ जागवली.

**4) स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण:-**

अरविंद घोषांनी स्वदेशी चळवळीला राष्ट्रनिर्मितीचे साधन मानले.स्वदेशी मध्ये भारतीय उद्योग, उत्पादन आणि पारंपरिक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यावर त्यांचा भर होता. अरविंद घोष पुढे असे म्हणत की आर्थिक स्वतंत्रता हा राजकीय स्वतंत्रतेचा पाया आहे. त्यामुळे भारताला राजकीय स्वातंत्र्य पाहिजे असेल तर त्या अगोदर भारताला परकीय आर्थिक शोषणातून मुक्त करून भारताला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करून दिले पाहिजे. तरच भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवणे शक्य होईल.ते प्राप्त करायचे असेल तर प्रथम ब्रिटिशांच्या परकीय  वस्तूवर बहिष्कार टाकला पाहिजे.ब्रिटिश वस्तू, संस्था, मूल्यव्यवस्था यांचा त्याग केला पाहिजे.हे केवळ आर्थिक शस्त्र नव्हते, तर मानसिक गुलामगिरीविरुद्धचा संघर्ष होता. त्या करिता, राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला पाहिजे,परकीय शिक्षण ही “दास्य मानसिकता” निर्माण करते. भारतीय संस्कृती, धर्म, अध्यात्म आणि राष्ट्रभाव यावर आधारित स्वशिक्षण अत्यंत आवश्यक आहे असे अरविंद घोष यांना वाटत होती. त्याकरिता त्यांनी राष्ट्रीय महाविद्यालय (National College, Calcutta) ची स्थापना केली.

**5) संस्कृतीप्रधान आणि एकात्मवादी राष्ट्रवाद:**

भारतीय राष्ट्रवादाचा पाया म्हणजे भारतीय संस्कृती, असा त्यांचा ठाम विश्वास होता.भारत एक राष्ट्र आहे कारण त्याचा आत्मा एक आहे. विविध भाषा, धर्म, जाती असूनही भारताची एकात्मता ही सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आहे.भारतीय राष्ट्रवाद पश्चिमी राष्ट्रवादापेक्षा अनन्य आणि व्यापक आहे.

**6) भारतीय राष्ट्रवादाचे अंतिम ध्येय – विश्वबंधुत्व (Universal Human Unity) :-**

अरविंद घोषांचा राष्ट्रवाद ही संकुचित संकल्पना नव्हती. त्यांनी राष्ट्रवादाचा परिणाम जगासाठी हितकारक असावा असे सांगितले. भारत स्वतंत्र होणे हे फक्त राजकीय उद्दिष्ट नाही, तर मानवजातीच्या आध्यात्मिक उत्क्रांतीचा एक टप्पा आहे.भारत जगाला अध्यात्म, योग, शांतता आणि मानवतावादाचा मार्ग दाखवेल.स्वतंत्र भारत हा विश्वबंधुत्वाचा मार्गदर्शक बनेल.

**निष्कर्ष :-**

वरील सविस्तर विवेचनावरून आपणाला असा निष्कर्ष काढता येतो की,अरविंद घोष यांचा राष्ट्रवाद हा आध्यात्मिक मूलतत्त्वांवर आधारलेला, सांस्कृतिक जागृतीचा, आर्थिक स्वावलंबनाचा आणि पूर्ण राजकीय स्वातंत्र्याचा सर्वांगीण विचार होता.त्यांचे राष्ट्रवादी विचार तीन मुख्य तत्त्वांवर आधारित आहेत

1) आध्यात्मिक राष्ट्रवाद

2) राजकीय क्रांती आणि स्वातंत्र्य

3) सांस्कृतिक पुनरुजीवन आणि राष्ट्रीय शिक्षण त्यामुळेच त्यांचे राष्ट्रवादी विचार आजही संपूर्ण भारतीय नागरिकांना प्रेरणादायी आणि त्यांच्या जीवनात परिवर्तनशील मानले जातात.

**संदर्भ ग्रंथ :-**


1) Socio-political Ideas of Aurobindo Ghose — Bidyut Chakrabarty

2) Reinventing Aurobindo Ghose : Ideational Vision and Nationalism - Bidyut Chakrabarty

3) भारतीय राजकीय विचारवंत- श्रीकांत विदेशपांडे

4) भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार - प्रा राम मुठाळ

5) भारतीय राष्ट्रवाद - डॉ सत्येंद्र त्रिपाठी डॉ. कृष्णदत्त द्विवेदी

6) भारतीय समाज और संस्कृती - डॉ कृष्णदत्त द्विवेदी

7) भारतीय राजकीय विचारवंत - प्रा डॉ कृ दि बोराळकर

8) भारतीय राजनीतिक विचारक - बी एम शर्मा, रामकृष्ण दत्त शर्मा, सविता शर्मा

9) भारतीय राजनीतिक विचारक - ओम प्रकाश गाबा

10) Indian Political Thinkers - Dr Sunita Gangwal